# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.
Fax No. २६६ २३ ७० Tel.No. Jt.Commr. २६२ ०२ ३८ Dy.Commr.२६६ ५५ ६९.

वाचले :१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१.१०.२०११
२) जीआरडी १३२०१६/३६/२ अ ३,दि.०१ जून,२०१७.

## परिपत्रक

क्रमांक : जीआरडी १३२०१६/३६/२-अ-२(भाग-४) मुंबई, दि.२६ ऑक्टोबर, २०१७.

या कार्यालयाच्या वरील वाचा अनु.क्र.२ वरील दि.०१ जून २०१७ च्या परिपत्रकान्वये या विभागातील जवान संवर्गीय राज्यस्तरीय तात्पुरती सामाईक सेवाज्येष्ठतजा यादी या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीमध्ये ज्येष्ठतेबाबत व इतर माहितीबाबत जर काही आक्षेप अथवा यादीमध्ये काही चुकिच्या नोंदी दर्शविल्या असतील तर संबंधित जवान संवर्गीय कर्मचाऱ्यांनी १५ (पंधरा) दिवसाच्या आत त्यांचे प्रतिवेदन योग्य कागदपत्रांच्या स्वाक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसहसंबंधित विभागीय उप आयुक्त / अधीक्षक यांचेमार्फत या कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने या कार्यालयास प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करून दि.०१.०१.२०१६ रोजीची जवान संवर्गीय राज्यस्तरीय अंतिम सामाईक सेवाज्येष्ठता यादी यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

विभागीय उप आयुक्त / अधीक्षकांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या जवान संवर्गीय कर्मचाऱ्यांना यादी दाखवून, त्यांनी ती पाहिल्याची नोंद त्यांच्या अभिलेखावर जतन करून ठेवावी.

परिपत्राकची पोच संबंधित विभागीय उप आयुक्त / अधीक्षक यांनी उलट टपाल द्यावी.

( डॉ अश्विनी जोशी )
आयुक्त
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

संबंधीत कर्मचारी
( मार्फत :- संबंधीत विभागीय उप आयुक्त / अधीक्षक )

**प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

१) सर्व विभागीय उप-आयुक्त / अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,

सर्व विभागीय उप-आयुक्त / अधीक्षकांना कळविण्यात येते की, सदर परिपत्राकान्वये राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान संवर्गीय कर्मचाऱ्यांची दि. ०१.०१.२०१६ रोजीची राज्यस्तरीय अंतिम सामाईक सेवाजेष्ठता यादी या विभागाच्या संकेत स्थळावर ( web-site - https://stateexcise.maharashtra.gov.in ) वर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीची प्रत (Hard copy) कार्यालयास पाठविण्यात येणार नाही. तरी संबंधीत विभागीय उप आयुक्त व संबंधीत अधीक्षकांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सदर सेवाजेष्ठता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे ही बाब आपल्या अधिनस्त सर्व जवान संवर्गीय कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दयावी व त्याबाबतची पोच अभिलेखावर घेण्यात यावी. सदरच्या पोच त्यांनी त्यांच्या अभिलेखावर जतन करावयात व हया कार्यालयास पाठविण्यात याव्या.

२) या कार्यालयातील कार्यासन क्र. २अ-१, २अ-२, २अ-३, २-क, ९, १२ (पाच प्रती)

( पी.एच.पवार )
प्र.सह आयुक्त (प्रशासन)
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई करिता.